# कोरोना : एक जैविक अस्त्र

संदीप तुंडूरवार, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

.......................................................................................................................................................

**सारांश :**

चीनमधील वुहान प्रांतात डिसेंबर महिन्यात पहिल्यांदा एका नव्या आजाराने ग्रस्त असा रुग्ण सापडला आणि त्यानंतर जगभरात नव्याने तयार झालेल्या विषाणूच्या बाबतीत चर्चेला सुरुवात झाली पुढे चालून जागतिक आरोग्य संघटनेने या विषाणूमुळे निर्माण झालेल्या आजारास 'कोविड-2019' असे नामकरण केलेत जरी हा नवा विषाणू असला तरी तो मात्र साथीच्या आजारांमध्ये सार्स,इबोला,स्वाईन फ्लू यांच्या परंपरेतील आहे वस्तुतः स्वाईन फ्लू चा पुढील अवतार म्हणून या आजाराकडे बघितल्या जाते परंतु आत्तापर्यंत आलेल्या साथीच्या आजारांमुळे जे प्रश्न वा स्थिती निर्माण झालेली नव्हती ती मात्र अनपेक्षितपणे,आश्चर्यकारकरित्या आणि कुणालाही अपेक्षित नसणारी व असाधारण परिस्थितीला जन्म देणारी ठरली आणि येथूनच चीनमधून पसरल्या गेलेल्या आजारांच्या बाबतीत एका बाजूला संशयाचे तर दुसऱ्या बाजूला भयग्रस्ततेचे मळभट दाटुन आलेत.जाणीवपूर्वक या विषाणूचा वापर करून जागतिक व्यवस्थेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केलेला आहे असे खुल्या स्वरूपात आणि चर्चेच्या माध्यमातून बोलायला सुरुवात झाली 'चीन कोरोना विषाणूचा निर्यातदार देश आहे' अशा स्वरुपाची संभावना करायला सुरुवात झाली त्याचाच परिणाम म्हणून जगातील 130 देशांनी चीनमध्ये प्रवास बंदी आणली, सोबतच पुढे जात आर्थिक संबंधांच्या बाबतीत पुनर्विलोकन करण्यास सुरुवात केली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प,तेथील परराष्ट्रमंत्री आणि आणि अमेरिकेचे सचिव माइक पोम्पिओ यांनी चीनमधील वुहान इन्स्टिट्यूट ऑफ वायरालॉजिकल या संस्थेमधून हा जिवाणू अथवा विषाणू व्हायरल केला असल्याचे आरोप करीत त्याबाबत अमेरिकेकडे सज्जड पुरावे असल्याचे अलीकडे सांगितले.जगात पहिल्यांदाच एखाद्या विषाणूने धुमाकूळ घातलेला सर्वजण सद्यस्थितीत अनुभवत आहे. जवळपास 200 देशांमध्ये कोरणा विषाणूची बाधा झालेली असून केवळ 14 देश या प्रभावापासून मुक्त आहेत जगातील रुग्ण संख्या छप्पन लाखांच्यावर गेलेली असून जगभरातील मृतांचा आकडा तीन लक्ष्याच्या वर पोहोचला आहे, खरेतर 1918 मध्ये 'स्प्यानिश फ्लु' आलेल्या साथीत जगभरात पाच कोटी लोक दगावले होते त्यावेळी भारतात दगावलेल्याची संख्या एक कोटी होती आणि भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ती एक पंचमांश होती. 1918 ते 1920 हा त्या वेळेसचा कालखंड अत्यंत भयप्रद आणि मानवी जीवनाला बाधित करणारा आणि संपवणारा असा ठरलेला होता जवळपास शंभर वर्षांच्या कालखंडानंतर अशाप्रकारच्या साथीच्या आजाराचा उद्रेक होत जगालाच मात्र विळखा घातलेला आहे. 1918 च्या तुलनेत सध्याच्या स्थितीत दखलपात्र असलेले काही संदर्भ मात्र दिसतात त्यातील पहिला भाग म्हणजे आजाराविषयी ची भीती त्यातून निर्माण झालेली असुरक्षितता आणि स्वतःला कोंडून घेण्याचा हा पहिला भाग, दुसरे म्हणजे प्रसारमाध्यमे इतकी प्रभावी नसल्यामुळे त्याची दाहकता, भीती त्यातून येणारा न्यूनगंड एक प्रकारची असुरक्षितता उद्भवलेली नव्हती, तिसरा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे जगाच्या इतिहासातील ही पहिली घटना होय एखाद्या विषाणूमुळे स्वतःला कोंडून घेण्याची पाळी जगभरातील जवळपास सर्वच देशांमध्ये आलेली आहे आणि त्यातून सामाजिक अंतर राखण्याचा नवा संदर्भ उदयास आलेला दिसून येतो. भारतासारख्या देशांमध्ये जिथे जातीय उतरंडीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात राहिलात त्या उतरंडीमध्ये सामाजिक अंतरांची भाषा होती हा सामाजिक भेदभाव नष्ट करण्याकरिता घटनात्मक व्यवस्थेची ची रचना उभी करावी लागली कायदा, घटना, राज्यसंस्था यांच्या अभया नंतरच सामाजिक भेदभाव बऱ्यापैकी काबूत ठेवण्यात यश मिळू लागले होते अशा परिस्थितीत कोरोना विषाणूमुळे नव्याने प्रसवल्या गेलेली सामाजिक अंतराची भाषा हेसुद्धा सामाजिक दोन भेदांचे आणि संघर्षाचे कारण ठरू शकेल अशी समाज शास्त्रज्ञांना वाटणारी भीती जागतिक परिवेशात धर्म,वंश,वर्ण या संदर्भात तर स्थानिक परिवेश यांमध्ये धर्म,वंश,वर्ण,जात,लिंग या आधारावर समजून घ्यावी लागते. कोरोना विषाणू हे जैविक अस्त्र होय काय? ह्यावर सध्या जगभरात खल सुरू आहे यामध्ये दोन सिद्धांत आहे यातल्या एका सिद्धांताने मनुष्यद्वारा प्राण्यांच्या भक्षनातून अशाप्रकारचा विषाणू पसरला गेला असे म्हटल्या गेले आणि तो थेट संपर्कात येत असल्यामुळे त्याची प्रभाव क्षमता आणि मारक क्षमता अधिक असल्याचे ठासून मांडल्या जात आहे.

चीनच्या वुहान प्रांतात सर्वप्रथम हा विषाणू आढळून आला त्या प्रांतातील लोकांच्या खाद्यसंस्कृतीच्या स्वरूपातून तो उदयास आला असे म्हटले जाते याचा तपशील तपासाला तर एकेकाळी हा प्रांत अत्यंत गरीब, दारिद्र्य याने गांजलेला आणि भूक बळीचा बळी ठरलेला प्रांत होता. 1970 च्या कालखंडात या प्रांतातील नागरिकांना जगविण्याकरिता वेगवेगळ्या

प्राण्यांच्या मासाचा खाद्य म्हणून त्यांच्याकरिता वापर करायला सुरुवात झाली आणि त्यामुळेच या प्रांतात सगळ्या प्रकारच्या प्राण्यांचे मांस भक्षण करणे ही जणू काही परंपरा तयार झालेली आहे. वुहान प्रांतातील खाद्यसंस्कृती कडे पाश्चात्त्य अथवा पौर्वात्य जग ज्या दृष्टीने बघते त्यामुळे संपूर्ण चिनी समुदायच अशाप्रकारची खाद्यसंस्कृती बाळगणारा आहे असाही एक दृष्टिकोन विकसित झालेला दिसून येतो, तरीपण वेगवेगळ्या प्राण्यांच्या भक्षनातून खासकरून वटवाघूळ, खवल्या मांजर यांच्यात हा विषाणू आढळतो त्याचे मासं खाल्ल्यामुळे वुहान प्रांतातील नागरिकांमध्ये तो पसरला गेला आणि त्यातूनच तो जगभरामध्ये पसरत पसरत एक प्रकारची भयावह स्थिती निर्माण केली हा सिद्धांत आम्ही स्वीकारतो त्यावेळी एखाद्या सत्तेने जाणीवपूर्वक त्याचा अस्त्र म्हणून वापर केलेला आहे यावर मात्र शिक्कामोर्तब होऊ शकत नाही, परंतु सध्याच्या दूरचित्रवाहिन्या, युरोपियन राष्ट्र, आफ्रिकन राष्ट्रे, भारतातील माध्यम जगत, अमेरिका या सगळयांचा कल मात्र जाणीवपूर्वक विषाणू पसरवून जगाची अर्थव्यवस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न करीत स्वतःचा साम्राज्यवाद उभा करण्याचा प्रयत्न चीनने चालविलेला आहे असे म्हटले आहे याचा अर्थ यातील दुसऱ्या सिद्धांताकडे घेऊन जातो आणि तो म्हणजे अशाप्रकारच्या विषाणूंना स्वतःच्या देशातील गुप्त आणि छुपे काम करणाऱ्या लेबोरेटरीज मध्ये त्यावर प्रक्रिया करून जैविक अस्त्राच्या स्वरूपात वापर करावयाचा आणि त्यातून स्वतःच्या देशाची एक साम्राज्यवादी व्यवस्था उभी करावयाची हा त्यामागचा स्पष्ट हेतू असतो. जगातल्या एकूण ज्ञात इतिहासात अशा प्रकारच्या जैविक अस्त्रांचा वापर इसवी सन पूर्व सहाव्या शतकापासून झालेला दिसून येतो आणि त्याचे संदर्भही दिसतात त्यामुळे जैविक अस्त्राची लढाई ही एकविसाव्या शतकाच्या कालखंडातील लढाई आहे हा प्रश्न मात्र येथे निकालात निघतो

या सिद्धांतातील एक महत्वाचा भाग म्हणजे जैविक अस्त्राच्या माध्यमातून जागतिक व्यवस्थेवर आपले नियंत्रण प्रस्थापित करणे आणि स्वतःच्या प्रभुत्वा खाली इतर देशांना आणणे हा हेतू आहे एकूणच युरोपियन राष्ट्र, अमेरिका, रशिया चीन या देशांची निर्माण झालेली बनावट ही साम्राज्यवादी परंपरांची आहे. एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगावर प्रभुत्व लादण्याची अथवा निर्माण करण्याची अभिलाषा सुप्तपणे अथवा अदृश्यपणे विकसित देशांच्या ठायी निर्माण झालेली दिसून येते. 1990 नंतर रशिया अनेक शकलामध्ये विभाजीत झालेला असला आणि आता आपल्या प्रभुत्वस्थानापासून दूर झालेला असला तरी स्वतःची एक शक्ती दाखवून देण्याचा प्रयत्न सातत्याने करताना आपल्याला दिसतो. मात्र अमेरिकेला चीन हा आपल्या बरोबरीने सत्तात्मक स्पर्धक म्हणून वाटू लागला आहे आणि त्यामुळे अशा प्रकारच्या लढाईतून जगावर प्रभुत्व स्थापन करणे अत्यंत सोपे आणि कमीत कमी आर्थिक दृष्ट्या नुकसानकारक असल्याचे मत तयार झालेले आहे त्यामधून या प्रकारच्या वस्तुस्थितीला एक प्रकारचा आधार मिळत असल्याचे लक्षात येते. जैविक अस्त्राचा इतिहास अमेरिकेला द्वितीय महायुद्धानंतरच्या कालखंडात लाभलेला असला तरी मात्र शीतयुद्धाच्या कालखंडात परमाणु अस्त्राच्या बरोबरीने जैविक अस्त्र निर्माण करण्यावर भर द्यायला सुरुवात झाली. विशेष:ता नाटो संघटनांची स्थापना झाल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांमधून जैविक अस्त्रांच्या बाबतीत आपापला प्रायोजित कार्यक्रम देशांनी चालवलेला दिसून येतो.

कोरोना विषाणू आहे अथवा जैविक अस्त्र याबाबतची चर्चा पुढच्या अनेक वर्षांमध्ये होणार आणि त्याला अनेक पैलू आणि वेगवेगळे संदर्भ असलेलेही दिसून येतील ज्या अहमिकतेने अमेरिका चीन वर आरोप करताना जैविक अस्त्रांची निर्मिती केली असा आक्षेप नोंदविताना दिसतो त्याबाबतची उरलेली अंगुली निर्देश नाटो संघटनांकडे जाते जुलै 2019 मध्ये क□नडा मधील एका ल□बोरेटरी मधून विषाणूची चोरी झाल्याचे प्रकरण उघडकीस आले आणि यामध्ये चीनमधल्या डॉक्टर दाम्पत्यांचा सहभाग असल्याचे म्हटले गेले. डिसेंबर महिन्यात चीनमधून एक नवाच विषाणू व्हायरल झाला आणि मग विषाणूच्या चोरीबाबत आरोपप्रत्यारोपां-ची सुरुवात झाली हे सर्व लक्षात घेतले तर अशा प्रकारच्या जिवाणू विषाणूंचा वापर जैविक अस्त्र म्हणून करण्याची परंपरा अलीकडच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे परमाणु अस्त्राच्या तुलनेत जैविक अस्त्रांची निर्मिती करून जगाला धमकावणे, घाबरवणे आणि कह्यात ठेवणे अधिक सोईचे आणि सोपे आहे. सीमांच्या संरक्षणाकरिता लागणाऱ्या खर्चापेक्षा विषाणूशी लढण्याकरिता लागणारा खर्च हा प्रचंड, अवाढव्य आणि आवाक्याबाहेरचा आहे हे आता अलीकडे जगातील मुख्य राष्ट्रांना समजून येऊ लागले आहे. एखादा विषाणू माणसाला कुलूपबंद करून जीवन जगावयाला लावतो अशी अभूतपूर्व स्थिती पृथ्वीच्या पाठीवर पहिल्यांदाच घडलेली दिसून येत आहे, केवळ कुलूपबंद नव्हे तर सर्व प्रकारची झापडबंद व्यवस्था यातून उदयास आली यामधून नको तेवढ्या प्रमाणात मात्र नागरिकांच्या कुलूपबंद पद्धतीवर होणारा खर्च अतोनात प्रमाणात वाढला. एका बाजुला कुलूपबंद

व्यवस्था दुसऱ्या बाजूला त्यांच्या भरण पोषण यांवरील खर्च-तिसऱ्या बाजूला येणारी जागतिक किंवा त्या देशातील प्रचंड महामंदी! आणि बंद पडलेले उद्योग-व्यवसाय, शेतीचक्र या सगळयांचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. अमेरिकन सरकारचे सगळयात मोठे दुखणं त्या देशातल्या आर्थिक प्रश्नांशी निगडित आहे. अमेरिकेला सतावणारी सर्वात मोठी भीती म्हणजे त्या देशाची अर्थव्यवस्था खालावल्यामुळे अमेरिका आर्थिक दृष्टीने मागे पडेल त्याचा दबदबा संपेल आणि विद्यमान राष्ट्राध्यक्षांना निवडणुकीमध्ये त्याचा फटका बसेल असे सरळ साधे समीकरण लक्षात घेतले तर त्यामागची चिडचिड, हेत्वारोप, आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची मानसिकता हे ठळकपणे समोर येताना दिसते अमेरिकेतील न्यूयार्क शहराचे दरडोई उत्पन्न 68 हजार 667 डॉलर्स, बीजिंग व शांघायचे दरडोई उत्पन्न जवळपास 42 हजार 775 डॉलर्स, तर भारताची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईचे दरडोई उत्पन्न 2850 डॉलर्स आहे ही एकूणच रचना लक्षात घेतली तर अर्थव्यवस्थेला बसलेला फटका हा लक्षात येऊ लागतो परंतु मूळ मुद्दा म्हणजे कोरोना चा विषाणू हे जैविक अस्त्र आहे काय? हे लक्षात घेताना एक विवाद्य प्रश्न म्हणून आपण त्याकडे बघितलं पाहिजेत कारण या प्रश्नाची सोडवणूक अजूनही झालेली नसल्यामुळे ते ठामपणे जैविक अस्त्र आहे अथवा नाही हे आज तरी स्पष्टपणे नोंदविता येणार नाही, परंतु जैविक अस्त्राचा झालेला वापर आणि त्याचा इतिहास पाहू जाता ते तसे नाही हे म्हणणे धाडसाचे ठरेल, खासकरून प्रत्येक देशामध्ये स्वतःच्या देशाच्या गुप्त अशा लेबोरेटरीज आहेत आणि त्यामधून वेगवेगळ्या प्रकारच्या जिवाणूंना जन्म देणे, राखून ठेवणे त्याचा वेळप्रसंगी वापर करणे याची एक रूपरेषा तयार केलेली असते अथवा झालेली असते आणि त्यामुळे जैविक अस्त्र म्हणून त्याचा वापर होत नाही हे म्हणणे धाडसाचे ठरेल यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा प्रकारच्या जैविक अस्त्रांची निर्मिती हा खरंतर अलीकडच्या परिभाषेतील बाजारवादाचा भाग होय. उदारवाद आणि नवउदारवादातून किमान श्रम आणि भांडवलदार या वर्गांमधील असणारी एक साखळी मोठ्याप्रमाणात जोडली गेली होती आणि त्यातून काही नवीन मूल्ये तयार झाली.तर दुसऱ्या बाजूला जगातल्या काही संस्थामध्ये आलेले मूलगामी अंतर पाहिले तर त्याचाही विपरीत परिणाम होऊन निसर्गाची साखळी तोडण्यावर आणि एक प्रकारच्या मानवी व्यवस्थेच्या मूल्यांना तिलांजली देण्याकडे वाटचाल झालेली आपल्याला दिसून येते. 1870 च्या काळात जागतिकीकरणाची प्रक्रिया वेग धरू लागली असली तरी तिलाच संघटितपणे मिळालेली चालना 1942 च्या कालखंडातील आहे तेव्हापासून तर 1990 पर्यंत असणारी तिची वाटचाल मंदगतीने झाली रशियाच्या रशियाच्या विघटनानंतर जागतिकीकरणाने वेग पकडला यातूनच बाजारवादाच्या नव्या भ्रष्ट स्वरूपाचा उदय झाला. बाजारवाद केंद्रित असतो आणि विशिष्ट संस्थात्मक रचनांना तो जोपासत असतो बाजारवाद एकाधिकारशाहीला चालना देणारा आहे. राजकीय सत्ता मध्ये एखाद्या व्यक्तीची सत्ता जशी संचालित होते तशीच अर्थव्यवस्थेच्या बाजारवादांमध्ये केंद्रीकरण्याच्या प्रक्रियेला वेग मिळतो यातील उदाहरण द्यावयाचे झाले तर मध्यंतरीच्या काळात जगातील नामवंत असणाऱ्या शेती व्यवसायातील दोन मोठ्या कंपन्यांनी एकत्रीकरण घडवून आणण्याकरिता वेग दिला होता त्यामधील एक कंपनी जर्मन आणि एक अमेरिकन आहे अमेरिकेतील कंपनीने जर्मन असणाऱ्या बायर कंपनी ला विकत घेण्याचा प्रस्ताव दिला कंपनीने तो मान्य केला पण संयुक्त राष्ट्र संघटनेने हस्तक्षेप करीत अशा प्रकारच्या एकाधिकारशाहीला आडकाठी आणली आणि यामधून बाजारवादाला नियंत्रित करण्याचा अल्पसा प्रयत्न जागतिक संघटनांकडून झाला हीच प्रणाली अलीकडच्या या जैविक अस्त्राचा संदर्भातील दिसून येते त्याचा वापर करून स्वतःची अर्थव्यवस्था आणि मग त्यातून साम्राज्यवाद त्यातून वर्चस्ववाद आणि नंतर एकसत्तात्मक व्यवस्था निर्माण करणे हे सूत्र त्यामध्ये काम करताना दिसते. चीनच्या साम्राज्यवादाची चुणूक भारताने 1962 च्या युद्धात अनुभवली आहे आणि चीनला खेटून असणारी उत्तर कोरिया, दक्षिणकोरिया,कंबोडिया,इंडोनेशिया,,ब्रह्मदेश,नेपाळ,तिबेट, व्हिएतनाम या सगळयाच भागांमध्ये एक प्रकारच्या वर्चस्ववादी तंत्रांचा वापर होताना दिसतो आणि त्यामधूनच दक्षिण कोरिया तैवान, वियतनाम, इंडोनेशिया यांच्यातील सुप्त संघर्ष बाहेर पडताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे साम्राज्यवादातून जगावर प्रभुत्व गाजविण्याची चीनची खुमखुमी बाहेर आलेली नसेल असे म्हणता येत नाही, पण या बाजारवादाची अमेरिका, युरोपियन राष्ट्र हेसुद्धा प्रतीक आहेत आणि हा सगळा खेळ बाजारवादाच्या प्रक्रियेतून स्वतःची साम्राज्य व्यवस्था उभी करण्याकडे आहे. जैविक अस्त्राच्या प्रश्नाकडे बघतांना विश्लेषक म्हणून आणि संशोधक म्हणून पाहताना विनोबांनी मांडलेल्या एका सूत्राची इथे प्रकर्षाने आठवण येते ते म्हणतात "मानवी रचनांमध्ये तीन प्रकारच्या स्वभावांची माणसं असतात किंवा आहेत एक मूढवादी, दुसरे गुढवादी आणि तिसरे रूढीवादी आहेत मूढवादी म्हणजे मूर्ख, मूर्खपणे एखादी गोष्ट सहज स्वीकारणे हा मूढवाद्यांचा स्वभाव असतो,तर गुढवादी माणसं चिकित्सक असतात आणि ते सातत्याने आपल्या प्रयोगाच्या माध्यमातून नित्यनूतन

शोधाकडे वळत असतात. रुढीवादांमध्ये परंपरेने आलेला विचारच बरोबर आहे असे समजून डोळे झाकून त्या मार्गाचे अनुसरण करतात"[१]. सध्याच्या कोरोनाच्या बाबतीत विनोबांनी प्रकटलेल्या तीन स्वभावाच्या माणसांची अथवा देशांची कल्पना आपल्याला येत आहे. काही देश अथवा व्यक्ती अत्यंत मूर्खपणे अथवा बेताल पणे विधाने करीत तोंडसुख घेताना दिसतात, थोडकी शहानी राष्ट्र मात्र त्याच्या रहस्याचा आपापल्या पातळीवर शोध घेऊन त्याच्या निराकरण करिता प्रयत्न करीत आहे आणि तीही प्रयत्न अत्यंत शांततेने आणि स्वतःच्या चौकटीमध्ये राहून करीत आहे,. मग ते लस शोधणे असो अथवा अर्थव्यवस्थेला उभारी देण्याकरिता अन्य पर्याय काय दिसतात याचा शोध घेता येणे असो आणि भविष्यात अशा प्रकारच्या विषाणूपासून नागरिकांचे संरक्षण करण्याकरिता कुठला आकृतिबंध आपण स्वीकारला पाहिजेत याबाबतची असणारी चर्चा असो. तिसरा वर्ग मात्र रूढवाद्यांचा आहे जो चीन विषयी आकस असलेला, फार खोलात न जाता वरवरच्या विधानांवरून इतर जे म्हणतात त्याला दुजोरा देत टीका करणाऱ्यांचा वर्ग आहे. खास करून एखाद्या व्यक्तीबाबत अथवा देशाबाबत ज्या धारणा तयार होतात त्या धारणा बरेचदा पिढ्यानपिढ्या कायम राहतात असा वर्ग कायम दुषित दृष्टीकोन घेऊन जगत असतो व त्याला तेच बरोबर वाटत असते या वर्गाचा उथळपना इतरांना त्रासदायक ठरतो.

**मूळ शब्द** : कोरोना विषाणू ,जैविकअस्त्र, अर्थव्यवस्थेची कुंठीत अवस्था, मानवी संरक्षण

**विषय प्रवश:**

जे.के.हार्डी यांनी 'एखादे महान तत्वही हटवादी स्पष्टीकरणामुळे इतके दडपले जाते की ती त्याची ओळखही पटेनाशी होते, इतकेच नव्हे तर कालांतराने मूळ तत्व ऐवजी कर्मठपणालाच अधिक महत्त्व प्राप्त होते म्हणूनच जी सूत्रे व शब्दसंहिता मूळ तत्त्वाशी अतूटपणे संबंधित आहेत एवढेच नव्हे तर त्यामुळे केवळ मूळ तत्त्वाचा बोध होतो असे सांगण्यात येते त्या सर्वांची चिकित्सा करणे उचित होय'.[२] हार्डी च्या या मांडणीचा संबंध सध्याच्या कालखंडा मधील कोरोणाच्या संदर्भात जोडून पाहता येऊ शकतो कोरोणा जैविक अस्त्र आहे का याबाबतची असणारी चर्चा पुढे नेत असताना जगाचा एकूणच इतिहास आपल्याला काय सांगतो हे सुद्धा पाहाने आणि समजून घेणे तितकेच रोचक आणि महत्त्वाचे आहे.

सध्याच्या स्थितीत ज्या महामारी चा सामना पण करतो आहेत अशा प्रकारची स्थिति इतिहासामध्ये आपल्याला दिसते काय यावर एक दृष्टिक्षेप टाकला तर काही गोष्टी निश्चितच आपल्यासमोर येतात इसवीसनपूर्व तीन हजार मध्ये चीनमधील मियोझिन्गु हमीम मान्धा या प्रांतात कुठल्यातरी आजारांमुळे अनेक लोक मृत्यू पावले आणि तेथील लोकांनी आपल्या सगळ्या मृत आप्तांना अग्नी देऊन त्या शहराचा त्याग केला. अथेन्स आणि स्पार्टा मध्ये इसवीसनपूर्व 430 मध्ये युद्ध झाले हे युद्ध जवळपास सोळा वर्ष चाललं आणि या युद्धात टायफाईड अथवा इबोला प्रकारचा आजार सैनिकांना झाला होता आणि त्यामुळे सैनिकांच विलगीकरण करण्यात आलं होतं. तर अथेन्समध्ये दोनदा प्लेग येऊन गेल्याचेही ही पुरावे दिसतात. रोमन साम्राज्यात इसवीसनाच्या 165 ते 80 या 15 वर्षाच्या कालखंडात पन्नास लक्ष लोक एन्शेनियनप्लेग नावाच्या आजाराने मृत्यू पावले होते.त्यावेळी मृत्युतून सुटका होण्याकरिता लोकांनी येशूची करुणा भाकली आणि भागलेली करुणा कुठेतरी ऐकल्या गेली असं समजून रोमन साम्राज्याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. मागील शतकात 1918 ते 1920 या कालखंडात स्प्यानिश फ्लु आला व त्याने जग व्यापले गेले होते किमान 5 कोटी लोकांचा यात मृत्यू झाला. त्यापूर्वी 1889 ते 90 या कालखंडात युरोप, आशिया, अमेरिका, आफ्रिका,इ.वेगवेगळ्या खंडांमध्ये अशाच प्रकारची महामारी आली आणि त्यात दहा लक्ष लोक मृत्यू पावले होते याचा अर्थ महामारी चा इतिहास सृष्टीच्या रचनेमध्ये बराच जुना आहे विशेषतः माणसं लिखित स्वरूपात कुठल्या तरी दस्तावेजाच्या रूपांनी मांडू लागले तेव्हापासूनचे पुरावे मात्र आपल्याला दिसून येतात अलीकडचा 1981 च्या कालखंडात उद्भवलेला HIV एड्स चा आजार यामुळे किमान जगभरातील 3 कोटीच्यावर अधिक लोक मृत्यू पावले असा जागतिक आरोग्य संघटनाचा अहवाल आहे. स्वाइन फ्लू, इबोला, H1G1, आत्ताचा नोबेलकोव्हीड2019 असे वर्णन करण्यात आलेला कोरोना या आजारांचा इतिहास पाहू जाता महामारी दुष्टचक्र हे नव्याने उद्भवले गेलेला आहे असे म्हणणे धाडसाचे ठरतं. जागतिक आरोग्य संघटनेने महामारी ची घोषणा उशिरा केली चीनच्या दडपणाखाली झाली विद्यमान जागतिक आरोग्य संघटनेचे अध्यक्ष चीनच्या प्रभावातील असल्यामुळे त्यांच्या आधिपत्याखाली वागतात अश्या स्वरूपाच्या अनेक चर्चा अनेक संदर्भ याला आहेत. मुळातूनच कुठली गोष्ट करत असताना एक प्रक्रिया राबविल्या जात असते आणि जगभरातला आढावा घेत असताना तो विचारपूर्वक ठरवावा लागतो. कधीही- कुठलीही घोषणा करता येत नाही कारण ही संघटना राजकीय नाही. तीला निकष लक्षात घेऊन निर्णय घ्यावा लागतो तसे तिने केले व जागतिक महामारी यासंदर्भातला विचार जागतिक आरोग्य संघटनेचे अध्यक्ष घेब्रेनस यांनी मार्च

महिन्याच्या १२ तारखेला जाहीर केला किमान पंधरा लाखाच्या मागे 70 लोकांचा मृत्यू व्हायला लागले असेल तर त्याला जागतिक महामारी घोषित केल्या जाते अलीकडच्या संदर्भात आपण विचार करायला लागलो तर जगाची एकूण लोकसंख्या साडेसातशे कोटी आहे. अश्या स्थितीत पंधरा लाखाच्या मागे झालेले 70 मृत्यू लक्षात घेतले तर घोषणा उशिरा झाली या प्रकारच्या दाव्यांना मग अर्थ उरत नाही. 1945 मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना,त्यानंतर शीतयुद्धाचा कालखंड, जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा भाग हा सगळे पाहू जाता सध्याची स्थिती अभूतपूर्व आहे संयुक्त राष्ट्र संघटने समोर उद्भवलेले हे आव्हान तितकेच गंभीर आणि वेगळ्या स्वरूपाचे हे लक्षात घेतले तर त्यावरची टीका निरर्थक जाणवते. केवळ एका प्रश्नाचा वेध घेता येतो की ही महामारी आहे की जैविक अस्त्राचा भाग आहे.

**विषय विवचेन** :

महामारी म्हणून बघायला गेलो तर त्यातून काही नव्या बाबी समोर आलेल्या दिसतात एक म्हणजे ख्रिश्चन धर्मवविस्तार घडून आला व दुसरे म्हणजे औद्योगीकरणाला चालना मिळाली.जागतिक संदर्भ तपासताना काही उत्तराकडे जाता येते व वर नोंदवल्या प्रमाणे भीतीतून रोमन साम्राज्याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला हे लक्षात येते. १३४६ ते १३५३ नंतर यूरोपमध्ये जलद गतीने औद्योगिक क्षेत्र बहरू लागलं कारण महामारीत मोठ्या प्रमाणात माणसे मृत्युमुखी पडली होती. त्यामुळे औद्योगिक क्रांतीचे १६ वे शतक म्हटल्या जात असेल तरी पण त्याची असणारी सुरुवात आपल्याला 1350 पासून दिसून येते आणि या पाठीमागे मनुष्यहानी, कामगार न मिळणे, श्रमिकांची कमतरता यामुळे तंत्रज्ञानाच्या विकासाला मोठ्या प्रमाणात वाव मिळाला असल्याचे स्पष्ट होते. आत्ताच्या महामारीमुळे पुन्हा विज्ञान मात्र बहरणार आहे 4.O या नावाने औद्योगिक क्रांतीचा चौथा टप्पा मागील दोन वर्षांमध्ये सुरू झाला आणि यामधून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्याचा वापर करून नव्या संसाधनांच्या माध्यमातून तांत्रिक विकास घडवत असताना सुलभ आणि औद्योगिक क्षेत्राला माफक दरामध्ये श्रम पुरवणाऱ्या वर्गांची रचना उभी करणे हा त्यामागचा भाग होता. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीमध्ये चीनकडे संशयास्पद रितीने पाहिल्या गेले यामागचे कारण म्हणजे चीनची एकूण असणारी ठेवण होय. चीन नेहमीच संशयास्पद राहिलेला आहे. वर म्हटल्याप्रमाणे हार्डी तत्वा प्रमाणे त्याचा शोध घेतला गेला पाहिजे. चीनचे एकूणच वर्तण, त्याचे आंतरराष्ट्रीय संदर्भ, त्या देशाची राजकीय प्रणाली, विचार व्यवस्था, साम्राज्यवादाची भूमिका अथवा साम्राज्यवादाच्या बाबतीमध्ये चीनची असणारी मानसिकता हे सगळं ज्या वेळेला आपण अनुभवू लागतो त्या वेळेला चीन विषयीचा असणारा संशय बळावू लागतो. कोरोना विषाणू चीनने जाणीवपूर्वक तयार करून त्याचा जैविक अस्त्र म्हणून वापर करीत आहे या विधानाला बळकटी मग मिळते हे चीनच्या संशयास्पद वर्तवणुकीचा परिपाक होय. अमेरिका जी भूमिका या बाबतीत घेऊन आहे त्या मागे हा तर्क दिसून येतो. इतर राष्ट्रे मात्र अमेरिकन सुरात सूर मिसळवून बोलतात त्यात तर्क नाही तर अगतिकता दिसून येते. वस्तुतः हा सगळा बनाव बाजारवादाचा आहे याकडे दुर्लक्ष होते सध्या नेमके तेच घडत आहे.

**जैविक अस्त्र वापराचा इतिहास** :

जैविक अस्त्राचा वापर जुनाच आहे अथेन्स ने किर्हाह राजसत्तेच्या विरोधात ई.स.पूर्व ६०० मध्ये हेलेबोरस या घातक विषारी पानांचा व मुळे यांचा वापर त्यांच्या पिण्याच्या पाण्यात करून त्यांना शरण यायला लावले होते.१३४६ मध्ये युक्रेन मध्ये तातार सेनेने प्लेग मृतांना सडवून रोग पसरवला व युद्ध जिंकले.२४ जून १८६३ मध्ये सर जेफ्री एमहर्स्ट यांनी रेड इंडिअन लोकांना चेचेक विषाणू असलेले कपडे वाटलेत व त्यांची हत्या घडवून त्यांचे राज्य नष्ट केलेत, ही उदाहरणे जैविक अस्त्राची भीषणता दाखविणारी आहे. 1925 मध्ये जपानने 'युनिट 731' नावाचे एक अभियान चालवले होते आणि अभियानाच्या माध्यमातून चीनच्या भागात विमानातून कोंबड्या करिता खाद्य म्हणून काही टाकण्यात आलं त्याच्यामध्ये प्लेगचे जंतू होते कोंबड्यानी मोठ्या प्रमाणात खाल्लं आणि कोंबड्यांचं मास खाद्य म्हणून चिनी जनतेने वापरलं आणि त्यातून प्लेगचा प्रसार चीनमध्ये झाला यात दहा हजाराहून अधिक नागरिक ठार झाल्याची नोंद आहे. इंग्लंडमधील वैज्ञानिकांनी जिवाणूंचा वापर स्कॉटलंडमधील प्राण्यांवर केला व भीषणता तपासली. हे सर्व संदर्भ आपल्याला जैविक आक्रमणांच्या स्वरूपात दिसून येतात. पहिला प्रतिबंधात्मक निर्णय राष्ट्रसंघाने 1925 मध्ये घेतला आणि अशा प्रकारच्या जैविक अस्त्रांचा वापर करणे हे मानवता विरोधी आहे अशा प्रकारची भूमिका अधोरेखित केली. तरीपण जैविक अस्त्रांचा वापर करणे हे सुरूच राहिले 1942 च्या कालखंडात अमेरिकेने यावर अभ्यास करायला, संशोधन करायला सुरुवात केली आणि याच कालखंडात जगातील जवळपास बहुतांशी राष्ट्रांनी स्वतःच्या छुप्या लॅबोरेटरी तयार करून जैविक विषाणूंना वाढवण्यास सुरुवात केली. 1971 पर्यंतच्या कालखंडात अमेरिकेला बऱ्यापैकी यश मिळाले आणि मग यांना नष्ट करण्याची

भूमिका घेतली. १९७२ च्या काळात जैविक अस्त्रावर जेंव्हा प्रतिबंध आणण्याचा विचार सुरु झाला तेंव्हा त्या बाबत स्पष्ट धोरण ठरवायला सुरुवात झाली व चाकोरोबद्ध मांडणी होऊ लागली. "जैविक अस्त्र म्हणून ज्याचा विचार करतो ते आधुनिक काळामध्ये वैज्ञानिकानी विविध शोध लावत विकसित केलेला प्रयोग होय. जिवाणू - विषाणू अशा सूक्ष्म जीवांवर छुप्या पद्धतीने प्रयोगशाळांमध्ये पुनरुत्पादन करण्याची प्रक्रिया सुरू करून त्याची क्षमता जोखली जाते व त्याचा वापर आपली सत्ता दृढ करण्याकडे केला जातो"[३]. आपल्या विरोधातील राष्ट्रे वा लोक यांच्या विरोधात वापर करून भय निर्माण करणे हा त्या मागचा हेतू असतो त्यातून साम्राज्यवादी किंवा विस्तारवादी धोरणे आखली जातात. जगावर प्रभुत्व स्थापन करण्याकरिता परमाणू अस्त्रांचा वापर करणे केवळ महत्वाचे ठरणार नाही तर त्याच्याही पलीकडे जात अशी अस्त्र शोधून काढली पाहिजे ज्यातून राष्ट्रांना भीती दाखवत स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करता येईल. त्यामुळे जगातल्या बहुतांश राष्ट्रांनी आपला काही निधी गोपनीय स्वरुपात उभा केला व अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारुन जैविक अस्त्राची निर्मिती करावयाला सुरुवात केली आज चीन मधून विषाणू बाहेर पडला म्हणून चर्चा करतोय परंतु अश्या अस्त्रांची पुंजी अनेक राष्ट्रांकडे असल्याने 'आपण ते सोवळे इतर ते बाटगे' हि वृत्ती स्वतः उघडे पडत नाही तोपर्यंत सुरूच राहणार आहे. प्रश्न कोरोना विषाणू जैविक अस्त्र आहे वा नाही याचा आहे व ते तपसावयाचे असेल तर दोन पातळ्या स्वच्छपणे समजून घ्याव्या लागतील.

जैविक अस्त्रांचा वापर खुल्या पद्धतीने करण्याऐवजी तो छुप्या पद्धतीने केला जातो ही त्यातील पहिला भाग आणि दुसरा भाग म्हणजे त्यांचा वापर केला जातो त्या वेळेला अशा प्रकारचे विषाणू आपल्यावरच उलटणार असेल तर काय खबरदारी घ्यावी याकरिताची पूर्वतयारी म्हणून संबंधित देश औषधे व संरक्षक साधने तयार करीत असतात चीनमध्ये या दोन्ही गोष्टी घडलेल्या दिसत नाही. चीनच्या लेबोरेटरीज मधून हा विषाणू विकसित केला जात असेल व तो भविष्यात वापरवायाचा ही कल्पना त्यांच्या डोक्यात निश्चित असेल आणि चीन ते करू शकते हे जगातील तर्कवाद्यांना, बुद्धिवाद्यांना, विश्लेषकांना पटणारी बाब आहे पण असाच विषाणू जगाच्या इतर भागात तयार होत नसेल हे ठामपणे सांगता येत नाही अमेरिकन डॉक्टरांनी या बाबत केलेली वक्तव्य पाहिली तर अमेरिका स्वताला यामधून बाहेर पडत दुसऱ्याना दूषण देऊ शकत नाही हे सुध्दा लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. चीन मधील सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ लीं वेनलियाग यांना या विषाणूच्या बाबतीत वेगळे पण जाणवले व त्यांनी शासनाला अवगत केले परंतु नेहमीप्रमाणे राष्ट्रद्रोह समजून त्यांच्यावरच कारवाई करण्यात आली आणि काही दिवसात त्यांचा मृत्यू झाल्याने याला बळकटी मिळाली. यापूर्वीचे जैविक अस्त्र व सध्याचा कोरोना यामध्ये एक मुलभूत फरक आहे व तो म्हणजे पूर्वीच्या महामारीत व जैविक अस्त्राच्या वापरात जितकी मनुष्यहानी झाली त्या तुलनेने सध्याची २,९४,६७८ लक्ष एवढी मनुष्यहानी ही संखेच्या दृष्टीने अधिक नाही परंतु त्याची भयावहता आणि परिणामकारकता आजपर्यंतच्या इतिहासात सर्वाधिक अशी आहे. त्याचप्रमाणे या विषाणूमुळे जगाची सर्व चक्रपाती थांबली असून सर्वाना कुलुपबंध व्हायला लावले आहे म्हणजेच जिवंतपणी सर्वचजन मृत्यूचा अनुभव घेत आहे, आणि एका पराभूत मानसिकतेत जगण्याला बाध्य केलेले अनुभवत आहोत. त्याचवेळी राजसत्तेची जगभरातच हुकुमशाही वाढण्यास हातभार लागला आहे व व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आलीत ती नजीकच्या काळात सैल होणारी नाही हा त्याचा सर्वात भीषण आणि दूरगामी परिणाम लक्षात घेतला तर मानवता भीतीच्या सावटाखाली वावरू लागल्याचे विषन्न करणारे चित्र मानसिकतेचा क्षय करणारे आहे.

जैविक अस्त्रा वरून सध्याच्या काळात जे रणकंदन जगभरात सुरू आहेत ते पाहू जाता आंतरराष्ट्रीय संबंधांमधील खेळ सिद्धांताचा भाग यांमध्ये अनुस्यूत आहे हे दिसू लागते.१७१० च्या कालखंडात हा सिद्धांत विकसित झाला मार्टिन काप्लान, आर्थर लीबर्न्स या सिद्धांताचे प्रवर्तक मानले जातात. "दोन देशांच्या संबंधांमध्ये परस्परांवर वर्चस्व अथवा कुरघोडी करण्याकरिता खेळाप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधात याचा वापर केल्या जातो खासकरून विरोधकांची असणारी शक्ती किती प्रमाणात आहे त्याची माहिती घेणे,कौशल्य पद्धतीचा विकास करणे या आधारावर ही सगळी प्रक्रिया उभी आहे"[4] ज्यावेळी जैविक अस्त्रांचा वापर एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांच्या विरोधात राष्ट्रहिताच्या दृष्टिकोनातून किंवा वर्चस्ववाद प्रस्थापित करण्याच्या अहमीकतेतून करू लागतो त्यावेळी इतर देशांची हेरगिरी करणे त्यांच्या कमतरतांची तपासणी करणे त्यांची शक्तिस्थाने नेमकी कुठे आहे याचा विचार करणे आणि या सगळयांना घेऊन मग युद्ध कौशल्याच्या प्रणाली प्रमाणे छुपे युद्ध वा खुले युद्ध करण्याची भूमिका स्वीकारणे हे पाहू जाता सध्याच्या काळातील विषानुतून उद्भवलेला प्रसंग अथवा स्थिती ही युद्धजन्य स्थिती म्हणून पाहू जाता तो खेळ सिद्धांताला अनुसरून असणाऱ्या युद्धपद्धतीचा डावपेच त्याचा भाग आहे का ते तपासता येऊ शकते. वस्तुतः सध्याच्या असाधारण आणि अभूतपूर्व परिस्थितीला अनेक कंगोरे आहेत त्याला

आंतरराष्ट्रीय परिमाणे आहेत आर्थिक घटका सोबतच राजकीय, राष्ट्रीय अस्मिता, सांस्कृतिक वर्चस्व, आंतरराष्ट्रीय प्रभुत्व ही सुध्दा परिमाण आहेत. जैविक अस्त्राविषयी देशो-देशींची धोरणे पाहू जाता वर्तमान विषाणू जैविक अस्त्राचा भाग आहे हे समजून येते व त्या मागे बाजारवादाची अभिप्रेरणा काम करताना स्पष्टपणे दिसून येते.

**जैविक अस्त्रावरील प्रतिबंध** :

जैविक अस्त्रातून होणारा विनाश लक्षात घेऊन त्या-त्या वेळच्या जागतिक अथवा प्रादेशिक संघटनानी त्यावर नियंत्रण आणण्याकरीता प्रयत्न केलेत व कायद्याची रचना उभी केली त्यातील पहिला प्रयत्न १९२५ मध्ये राष्ट्रसंघाने केला आहे. '1925 मध्ये जिनेव्हा गस व बक्टेरिआलॉजिकल वारफेअर प्रोटॉकाल'[5] हा तयार करण्यात आला आणि या कायद्यान्वये कुठल्या प्रकारची रासायनिक अथवा जिवाणू विषाणूंचा वापर करून युद्ध पद्धतीचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला खरतर युद्धाच्या नियमांमध्ये याला समाविष्ट करण्यात आले. यापूर्वी 1907 मध्ये हेग कन्वेंशन झालेत त्यामध्ये सुद्धा अनेक नियम करण्यात आले होते आणि नियम करत असताना युद्ध स्वरूपातील असणारी सैनिक आणि त्यांच्याद्वारे वापरण्यात येणारी संसाधने याबाबतच्या नियमांवर भर देण्यात आला होता. 1949 मध्ये पुन्हा जिनेव्हा कन्वेक्शन झाले आणि त्यातही युद्धाच्या स्वरूपातील तरतुदींचा समावेश करण्यात आला हे सगळे पाहू जाता 1925 नंतरच्या कालखंडानंतर जैविक अस्त्रांच्या विरोधामध्ये सबळ असा कायदा 1972 मध्ये निर्माण झाला. जैविक अस्त्रातून होणारी हानी त्याचा परिणाम या सगळयांना लक्षात घेऊन 'जैविक शस्त्र अधिनियम 1972' पारित करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पारित करण्यात आलेल्या या कायद्यावर जगातील एकशे तीन देशांच्या स्वाक्षऱ्या होत्या अलीकडच्या काळामध्ये जवळपास सगळया देशांनी त्याला संमती दिली आहे यातील महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकेने 1940 च्या दशकानंतर जैविक अस्त्राना विकसित करण्याचा प्रयत्न केला 1971मध्ये त्याला यश आले आणि 1971 मध्येच अमेरिकेने घोषणा केली की आता आम्ही जैविक अस्त्र नष्ट करीत आहोत. जैविक अस्त्र विषयीची असणारी क्षमता विकसित केल्यानंतरच जगभरातील बड्या राष्ट्रांनी कायदे स्वीकारल्याचे आपल्याला पाहायला मिळतात. सध्या चीनच्या बाबतीत राष्ट्र संघटना अथवा जागतिक आरोग्य संघटना त्याला अनुकूल आहेत असा विचार मांडलाजातोय पण यापूर्वीच्या घटना पाहिल्या त्यातही बड्या राष्ट्राचे हितसंबध लक्षात घेऊन युनो आपले वर्तन करीत आलेले दिसते याचा अर्थ हा बेबनाव युनो निर्मिती पासूनच आहे आजच्या वर्तमान स्थितीला दोष देण्याचा चाललेला प्रयत्न पोकळ असल्याचे समोर येते. अलीकडच्या काळामध्ये 2001 मध्ये अमेरिकेने त्याच्या रक्षा मंत्रालय विभागाने अशी घोषणा केली की त्यांच्याद्वारे जैविक अस्त्राचा पुनर्विकास केला जातो आहे ही घटनाच आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या विरोधात जाणारी आहे अशा स्थितीत अन्य राष्ट्रे शांत बसून राहतील अशी अपेक्षा करता येत नाही कारण आंतरराष्ट्रीय स्थान नैतिकता जोपासून राखता येत नाही यावर सर्वांचं एकमत आहे त्यामुळे जैविक अस्त्राची निर्मिती बिनद्दीक्त युनोला न जुमानता सुरु आहे हे समोर येते. युनोचे प्रतिबंध कुचकामी ठरलेले दिसून येतात याचा अलीकडचा पुरावा म्हणजे युनोचे महासचिव अंतोनियो गुट्रेस यांनी कोरोना पश्चात जागतिक संघर्ष भडकू शकतो अशी शक्यता वर्तवली आहे याचा सरळ अर्थ युनो सध्याच्या स्थितीत गलितगात्र बनली आहे.

**समालोचन** :

12 मार्च 2019 ला जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूला महामारी म्हणून घोषित केले त्यावेळी हा आजार जगभरात पसरला नव्हता परंतु अल्पावधीतच याने जगभर खळबळ उडवून देत अख्या जगाला कवेत घेतले आहे.जगातील १४ राष्ट्रे वगळता रुग्ण संख्या १ कोटी चे अंतर कापण्यास उत्सुक झालेली दिसत आहे. या अस्त्राचा अथवा विषाणूचा परिणाम पाहू जाता काही निष्कर्ष नोंदविता येतात. मुख्य म्हणजे युनो गलितगात्र झाली असून तिच्या अस्थित्वावर शंका येत आहे तसेच जागतिक बँकचे महत्व कमी झालेत आणि जागतिक आरोग्य संघटनेणे आपली पत गमावली आहे. अभूतपूर्व व असाधारण अशी परिस्थिती निर्माण झाल्याने या अभूतपूर्व परिस्थितीला नेमकं कसं सामोरं जावं असा जगभरातील राज्यकर्ता समोरचा पेच आहे परिणामतः प्रत्येक देश स्वतंत्र धोरण आखण्याचा प्रयत्न करीत असून त्यात नेमकेपणा नाही भारत त्याचे उदाहरण आहे. बेताल वक्तव्य करण्याची एक प्रवृत्ती या काळात जन्माला आली असून परस्परावर केवळ कुरघोडी करण्याचा खेळ सुरु आहे. आर्थिक व्यवस्थापन कोसळले त्या मुळे बेरोजगारीत मोठी वाढ नोंदविल्या गेली एकट्या अमेरिकेत २.५० कोटी बेरोजगार झालेत तर भारतात १८ कोटी लोक आपला रोजगार टाकून गावाकडे स्थलांतरित झालेत. युनो च्या आकडेवारीनुसार अशीच स्थिती राहिली तर जगात भूकबळी संख्या २८ कोटी राहू शकेल. सामाजिक आणि धार्मिक भेदभाव नीतीला उत्तेजन मिळण्याची शक्यता भारतासह जगभरात आहे त्याची प्रतिक्रिया

उमटेल त्यातून संघर्ष व रक्तपात घडून येईल परिणामी एकात्मतेची वीण नष्ट होण्याची भीती मनोविश्लेषक नोंदवीत आहेत. तंत्रज्ञानत बेसुमार वाढ होऊ शकते कारण लोकांना जर घरी बसवून सुरक्षित राखावयाचे असेल तर मनुष्य विरहित तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज आहे त्यामुळे कृतीम वस्तूंची वाढ होईल. लोकशाहीचा ढाचा बदलेल सांसदीय लोकशाहीचे महत्व कमी होऊन एककेंद्री नेतृत्वावर लोकांचा भर वाढेल याचे कारण लोकांना त्वरित निर्णय हवा असेल परिणामी लोकस्वातंत्र्य मोडीत निघेल व लोकशाही संवर्धक संस्थाचा लोप घडून येईल. आत्मकेंद्री आणि स्वमग्न माणसांची नवी व्यवस्था आकार घेऊ शकते त्यामुळे सामुहिक जीवनप्रणाली मागे फेकल्या जाईल. भांडवलशाही अधिक जोमाने काम करेल व त्यात कामगार त्यांचे हक्क, वेतन,आरोग्य सुरक्षा यांना कायद्याचे संरक्षण असणार नाही. कुलुपबंद मानसिकतेच्या सवयीमुळे लोक एका बाजूला संवेदनशीलपणा घालवतील तर दुसऱ्या बाजूला अविश्वास, संशय या वातावरणाचे वाहक बनतील. पर्यावरणात मोठा बदल घडून येणे अपेक्षित आहे अधिक प्रमाणात निसर्गाच्या बेसुमार शोषणाला प्रारंभ झालेला राहील. मनुष्यबळा ऐवजी कृत्रिम बुद्धीम्मत्तेला बळ मिळणार आहे.

कोरोना विषाणूने घडविलेला बदल पाहू जाता जैविक अस्त्राची परिणीती काय आहे याचा लेखाजोखा आपणासमोर आहे अश्या वेळी अस्त्र म्हणून त्याचा वापर करावा काय हा प्रश्न अंतिमतः नैतिकतेच्या पातळीवर सोडवणे गरजेचे आहे भलेही राष्ट्रीय हितामध्ये नैतिकता महत्वाची ठरत नसली तरी जेंव्हा मानवी अस्थित्वाचा प्रश्न येतो तेंव्हा योग्य-अयोग्य याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.तेंव्हा राष्ट्रीय हितापेक्षा जगाचे हित महत्वाचे मानवे लागते ज्याचा प्रारंभ बुध्द,गांधी,टागोर,विनोबा यांच्या विचारात आहे. आल्बर्ट आईनस्टांईन यांनी गांधीच्या मृत्युनंतर वाहिलेली भावपूर्ण श्रद्धांजली फार महत्वाची व वर्तमान जागवणारी आहे “नेहमीच्या फुसक्या कावेबाज व लबाड राजकीय डावपेचात जनसमुदायास झुलवून आपलस करण्याऐवजी सर्वसामान्यांना पटणाऱ्या आपल्या उच्च प्रतीच्या नैतिक वागणुकीन गांधीजीनी फार मोठा जनसमुदाय आपल्या पाठीशी उभा केला. आजच्या काळात झालेला नीतिमत्तेचा ऱ्हास पाहता नीतिमत्तेच्या या महापुरुषाचे व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने उठून दिसते”[6] सध्याच्या आजूबाजूच्या खुज्या नेतृत्वाकडे पाहू जाता गांधीनी घेतलेली विश्वमानवतेची भूमिका तपासली तर त्यात माणसाचा विनाश घडवून आणणाऱ्या सर्व प्रकारच्या अघोरी संसाधनांना,अस्त्रांना नकार दिलेला आहे. सध्याच्या विषाणूंचे बूमरँग पाहिले तर त्याची खात्री अधिक पटते यातून शहाणे व्हायचे की मुडदूसा सारखे जगायचे याचा निर्णय घेण्याची ही निर्णायक वेळ आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. महागुहेत प्रवेश, विनोबा,परंधाम प्रकाशन पवनार,२००८,पृ.क्र.२५
२. विसावे शतक आणि समाजवाद,कृ.ना.वळसंगकर, महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई,१९७३ पृ.क्र.८
३. आंतरराष्ट्रीय संबंध, ए.सी.सिंहल, लक्ष्मीनारायण अग्रवाल,आग्रा,२००४,पृ.क्र.३८१
४. आंतरराष्ट्रीय संबंध, पंडित नलावडे कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद,२०१४,पृ.क्र.६९
५. आंतरराष्ट्रीय कायदा, डॉ.व्ही.एम.पेशवे,व्यंकटराज प्रकाशन,यवतमाळ,२००३, पृ.क्र.५२
६. महात्मा गांधी, लुई फिशर(अनुवाद वि.रा.जोगळेकर),साधना प्रकाशन,पुणे,२०१९, पृ.क्र.१३